| MHBI120009222023 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | खटला दाखल ता. | – | २६.०७.२०२३ | | |
| | खटला नोंदणी ता. | – | २७.०७.२०२३ | | |
| | खटला निकाल ता. | – | ०२.०६.२०२६ | | |
| | कालावधी | – | वर्षे | महिने | दिवस |
| | | | ०२ | १० | ०७ |

| | |
|---|---|
| | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धारुर, ता.धारुर, जि.बीड यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी : एन.एम. वाली)**<br>**(न्यायनिर्णय दि.०२.०६.२०२६ रोजीचा)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.१२५/२०२३** **नि.क्र.४०/ब**<br>सी.एन.आर.क्र.एम.एच.बी.आय.१२–०००९२२–२०२३ |
| | धारूर पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्र.५१/२०२३,<br>भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये. |
| सरकार पक्ष / फिर्यादी | महाराष्ट्र सरकारतर्फे, धारूर पोलीस स्टेशन,<br>फिर्यादी – आसाराम विठ्ठल माने |
| विधिज्ञ | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री.एस.एन.थेरोकार |
| आरोपी | १. नितीन राधाकिसन मोरे,<br>वय ४० वर्षे, |

| | |
|---|---|
| | २. बालासाहेब राधाकिसन मोरे,<br>वय ४२ वर्षे,<br>३. सविता नितीन मोरे,<br>वय ४८ वर्षे,<br>सर्व रा.चोरंबा, ता.धारुर, जि.बीड |
| विधिज्ञ | विधिज्ञ श्री.एम.एस.अहंकारे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०५.०३.२०२३ |
| फिर्याद दाखल तारीख | १०.०३.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २६.०७.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १३.०९.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १३.०३.२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | --- |
| निकालाची तारीख | ०२.०६.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, जर शिक्षा झाली असेल तर | --- |

| अनु. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्र.संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नितीन | १३.०६. | १३.०६. | भारतीय दंड संहिता | निर्दोष | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | राधाकिसन मोरे | २०२३ | २०२३ | १८६० चे कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये. | मुक्त | | |
| २. | बालासाहेब राधाकिसन मोरे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ३. | सविता नितीन मोरे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | निर्दोष मुक्त | -- | -- |

**साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | आसाराम विठ्ठल माने | फिर्यादी | ३४ |

**ब . आरोपीचा साक्षीदार नाही**

**क. न्यायालयाचा साक्षीदार नाही**

**निशाण्यांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी ३५ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी ३६ | जप्ती पंचनामा |
| ३. | निशाणी ३७ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ४. | निशाणी २ | मुद्देमाल पावती |

**ब. आरोपी पक्षाची निशाणी नाही –**

**क. न्यायालयाची निशाणी नाही**

**ड. महत्वाच्या बाबी नाहीत**

## न्या य नि र्ण य

(दिनांक ०२.०६.२०२६ रोजी जाहीर )

१. आरोपी यांच्यावर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवून खटला चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

दिनांक ०५.०३.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजताचे सुमारास फिर्यादी हे त्यांची मोटारसायकल घेवून चोरंबा येथून आरणवाडी येथे येत असताना कृष्णा मुळे याचे रसवंती जवळ येताच फिर्यादी यांना कोणाचा तरी फोन आल्याने फिर्यादी यांनी त्यांचा मोबाईल फोन बघितला व नंतर फिर्यादीने त्यांचा फोन शर्टच्या खिशात ठेवला. थोड्या वेळाने फिर्यादी यांना त्यांचा फोन पडल्याचे लक्षात आल्याने फिर्यादी हे परत रसवंती जवळ गेले असता फिर्यादी यांना त्यांचा मोबाईल चोरंबा येथील माऊली मोरे यांच्याजवळ दिसल्याने फिर्यादीने मोबाईल परत मागितला असता तेथे उभे असलेले माऊली मोरे याचे वडील फिर्यादीजवळ आले व फिर्यादीला 'तुझा कशाचा मोबाईल' असे म्हणून फिर्यादीला शिवीगाळ करू लागले. त्यावेळी आरोपी क्र.१ याने त्याच्या हातातील लाकडी काठी फिर्यादीच्या डोक्यात मारली. त्यावेळी तेथेच बाजूला ऊसाचे ट्रॅक्टर भरत असलेले बालाजी राधाकिसन मोरे, विधीसंघर्षग्रस्त बालक राधाकिसन नितीन मोरे व आरोपी क्र.३ हे सर्व जण फिर्यादी जवळ आले व फिर्यादीला चापटाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. त्यावेळी फिर्यादी तेथेच बेशुध्द पडले होते. त्यानंतर फिर्यादीचे वडील व भाऊ यांनी फिर्यादीला उचलून पोलीस स्टेशन, धारूर येथे आणल्यानंतर पोलिसांनी फिर्यादीला पत्रक देवून सरकारी दवाखाना येथे पाठविले. तेथील डॉक्टरांनी फिर्यादीवर थोडा उपचार करून फिर्यादीला अंबाजोगाई येथे पाठविले. तेथील डॉक्टरांनी फिर्यादीवर थोडा उपचार करून पुढील उपचाराकामी सरकारी

दवाखाना, लातूर येथे पाठविले. सरकारी दवाखाना, लातूर येथे उपचार घेतल्यानंतर फिर्यादीने आरोपींविरूध्द फिर्याद दिली.

३. फिर्यादी यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने धारूर पोलीस ठाणे मध्ये आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधासाठी गुन्हा रजि.नं.५१/२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास श्री.एस.बी.मुंडे, पोलीस हवालदार यांनी केला. तपासा दरम्यान त्यांनी जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा तयार केला, फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपासाअंती त्यांनी प्रस्तुतच्या आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ खालील शिक्षापात्र अपराधासाठी दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे न्यायालयीन पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ खालील शिक्षापात्र अपराधासाठी दोषारोप निशाणी २६ येथे निश्चित केले व ते आरोपींना वाचून दाखवले व मराठीत समजावून सांगितले असता, आरोपींनी त्यांच्यावरील आरोप अमान्य केले व अभियोगाची संपरिक्षा करण्याची विनंती केल्याने त्यांचेविरुध्द खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षाच्या पुराव्यादरम्यान आरोपींचे विरुध्द कोणताही संयुक्तीक पुरावा आला नाही. त्यामुळे फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वयेचा आरोपींचा जबाब नोंदवण्यात आला नाही.

५. वरील सर्व बाबींचा विचार करता या प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी माझे पुढे उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निर्णय |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक | |

| | | |
|---|---|---|
| | ०५.०३.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजण्याच्या सुमारास मौजे चोरंबा, ता.धारुर, जि.बीड गावाच्या हद्दीत कृष्णा मुळे याचे रसवंती जवळ आरोपींनी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी आपसात संगनमत करून आरोपी क्र.१ ने फिर्यादी यांना लाकडी काठीने डोक्यात मारहाण करून ईच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहचविली व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांना चापटाबुक्क्यांनी मारहाण करून ईच्छापुर्वक दुःखापत केली व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांना हेतुपूर्वक अपमानित करण्याच्या हेतुने शिवीगाळ केली आणि चिथावणी दिली, हेतुतः आणि माहिती असताना की, त्याद्वारे त्याच्या हातून सार्वजनिक शांततेचा भंग होईल व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांना घाबरवण्याच्या हेतुने धमकी देवून गुन्हेगारी धाकदपटशा केला व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५. | अंतिम आदेश काय ? | आरोपींना निर्दोष सोडण्यात आले. |

**<u>कारणमिमांसा</u>**

६. प्रस्तुत प्रकरणात आरोपीं विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ फिर्यादी म्हणजेच सा.क्र.१ आसाराम विठ्ठल माने यांना निशाणी क्र.३४ वर तपासले आहे. फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने व आरोपींनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, वैद्यकीय प्रमाणपत्र व मुद्देमाल पावती मान्य केल्याने व निशाणी ३८ वर पुरावा बंद पुरसिस दाखल केल्याने निशाणी १ वर आदेश करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ४ करीता –</u>**

७. आरोपींवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचे स्वरुप व खटल्याच्या सुनावणी दरम्यान अभियोग पक्षाने सादर केलेला एकंदरीत पुरावा लक्षात घेता, माझ्या मते मुद्दा क्रमांक १ ते ४ ची कारणमिमांसा एकत्रीतपणे घेणे योग्य होईल.

८. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ फिर्यादी आसाराम विठ्ठल माने यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे कथन केले की, दि.०५.०३.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजण्याच्या सुमारास चोरंबा येथे त्यांची आरोपींसोबत कुरबुरी झाली होती. याव्यतिरिक्त काहीही झालेले नाही. सदर दिवशी आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून काठीने व चापटबुक्क्यांनी मारहाण करून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे त्यांनी नाकारले आहे. त्यानंतर त्यांनी दि.१०.०३.२०२३ रोजी फिर्याद दिली होती. त्याखाली त्यांची सही आहे. परंतु त्यातील मजकूर त्यांना माहित नाही. फिर्यादी याने अभियोग पक्षाच्या हकीकतीस पुष्टी देणारा, अभियोग पक्षाच्या समर्थनार्थ पुरावा न दिल्याने सरकारी वकीलांनी त्याला सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी घेवून त्यांना सूचक प्रश्न विचारले. सदर तपासणी दरम्यान फिर्यादीने

निशाणी ३३ वरील तडजोडपत्रावर स्वईच्छेने सही केल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सदर तपासणीदरम्यान देखील आरोपींविरुध्द कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

९. आरोपींतर्फे जरी घटनास्थळ पंचनामा (निशाणी ३५), जप्ती पंचनामा (निशाणी ३६), वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी ३७) व मुद्देमाल पावती (निशाणी २) मान्य करण्यात आले असले तरी त्यावरुन आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द होणार नाहीत कारण अभियोग पक्षाचे केसला पुरक व सुसंगत असा पुरावा फिर्यादीतर्फे दिलेला नाही व स्वतः फिर्यादीने सदर घटना घडलेची बाब नाकारली आहे व ती बाब फिर्यादीने अधोरेखित केलेली नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द लावलेले कोणेतेही आरोप सिध्द होत नाहीत.

१०. खटल्याच्या सुनावणी दरम्यान आरोपींमध्ये व फिर्यादी यांचेमध्ये आपसात तडजोड झाल्याचे कथीत करुन सदर खटला निकाली काढण्याबाबत तडजोड अर्ज नि.क्र.३२ दिला. परंतु आरोपींवरती ठेवण्यात आलेला गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने व तडजोड पात्र नसल्याने आरोपींची सदर विनंती फेटाळण्यात आली. फिर्यादी हा सदर खटल्यातील महत्वाचा साक्षीदार होता. फिर्यादी यांनी अभियोग पक्षाने घेतलेल्या तपासात निशाणी ३३ वरील तडजोडपत्रावर स्वईच्छेने सही केल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने घडलेली घटना नाकारल्याने, अभियोग पक्ष आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करु शकला नाही.

११. अभियोग पक्षाच्या समर्थनार्थ व सुसंगत असा पुरावा फिर्यादीतर्फे दिलेला नाही व स्वतः फिर्यादी यांनी सदर घटना घडलेची बाब नाकारली आहे. त्यामुळे दिनांक ०५.०३.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजण्याच्या सुमारास मौजे चोरंबा, ता.धारुर, जि.बीड गावाच्या हद्दीत कृष्णा मुळे याचे रसवंती जवळ आरोपींनी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी आपसात संगनमत करून आरोपी क्र.१ ने फिर्यादी यांना लाकडी काठीने डोक्यात मारहाण करून ईच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहचविली, फिर्यादी यांना चापटाबुक्क्यांनी

मारहाण केली, फिर्यादी यांना शिवीगाळ केली व त्यांच्यावर गुन्हेगारी धाकटपटशा केला या बाबी शाबीत होत नाहीत. कारण या बाबी फिर्यादीने अधोरेखित केल्या नाहीत. त्यामुळे आरोपींविरुध्द लावलेले कोणतेही आरोप सिध्द होत नाहीत.

१२. अशा परिस्थितीत अभियोग पक्षाने सादर केलेला एकंदरीत पुरावा लक्षात घेता, आरोपी यांचेवर ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वयेचे दोषारोप निर्विवादपणे सिध्द करण्यामध्ये अभियोग पक्षाला अपयश आले आहे. म्हणून मुद्दा क्रमांक १ ते ४ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता –</u>**

१३. मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत नकारार्थी अभिप्राय नोंदविला असल्यामुळे अभियोग पक्षाने आरोपींवरील अपराध शाबीत केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी हे वरील अपराधातून दोषमुक्त होणेस पात्र आहे. पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल एक साल नसलेली काठी याची अद्याप कोणीही मागणी केलेली नाही व सदरचा मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्रमांक ५ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आ दे श</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १. नितीन राधाकिसन मोरे, २. बालासाहेब राधाकिसन मोरे व ३. सविता नितीन मोरे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २४८(१) प्रमाणे, भारतीय दंड संहिता कलम १८६० च्या कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वयेच्या गुन्हयांमधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) करीता पूर्वी दिलेले जामीन अपिल कालावधीकरीता कायम करण्यात येत आहेत. तसेच आरोपींनी |

| | |
|---|---|
| | अपिल कालावधीकरीता प्रत्येकी र.रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे. |
| ३. | पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल एक साल नसलेली काठी मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला )

NILESH MALAKAPPA WALI
Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2026.06.02 15:43:13 +0530

ठिकाण– धारुर (निलेश एम.वाली)
दिनांकः ०२.०६.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धारुर.

:: **Certificate of Stenographer** ::

“ I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order. ”

Sd/-
(Amol D. Mule )
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur